**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ७२/२०२४ मध्ये निशाणी क्र.२० खालील आदेश</u>**
**<u>(बापु पगार वगैरे वि. राजेंद्र पगार वगैरे)</u>**

**१.** प्रतिवादी क्र.१ ने सदरचा अर्ज हा दाव्यात न्यायालयीन आयुक्ताची/कोर्ट कमिशनरची नेमणुक होउन मिळणेबाबत दाखल केला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे दि. ०२.०२.२०२३ रोजी गट नं.३७९ ची झालेली मोजणी वादींना मान्य व कबुल नसल्याने त्यांनी प्रतिवादींविरूध्द सदरचा दावा दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये वादींनी गट नं. ३७९ चे चार भाग झाल्याचे नमूद केले आहे. गट नं.३७९/१, ३७९/२, ३७९/३ व ३७९/४ या गटाचे खातेदार वेगवेगळे असून प्रत्येकाचे नावे ७/१२ उता—यास सारखेच क्षेत्र १ हे.२३ आर. दाखल झालेले आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ने सदरचा अर्ज हा गट क्रमांक ३७९/१, ३७९/२, ३७९/३ व ३७९/४ ची मोजणी भुमापन अधिकारी, देवळा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुण नेमणुक करून त्यांच्याकडुन करून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**२.** वादी क्र.३, ५ व ८ यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे निशाणी २८ वर दाखल केले आहे. वादींच्या कथनाप्रमाणे वादीने सदरचा अर्ज हा खोटा, चुकीचा व बेकायदेशीर आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी मा. उपअधिक्षक भुमी अभिलेख, देवळा यांचेकडे अतितातडीचा मो.र.नं.१२४७/२०२२ प्रमाणे अर्ज करून दि.१२.०४.२०२२ रोजी मोजणी करून त्याप्रमाणे नकाशा तयार केला आहे. सदर नकाशामध्ये वादींनी अतिक्रमण केल्याबाबत कोणताही उल्लेख नाही. वादींनी प्रतिवादी क्र.१ व २ यांचे मिळकतीत कोणत्याही प्रकारे अतिक्रमण केलेले नसताना प्रतिवादी क्र.१ ने वादीला कोणतीही माहिती न देता परस्पर पुन्हा मो.र.नं.१३५२/२०२२ प्रमाणे मोजणी केलेली आहे. या मोजणीवेळी मोजणी अधिकारी यांनी प्रत्यक्ष मिळकतीत न येता बेकायदेशीर मोजणी नकाशा तयार केलेला आहे. प्रतिवादी सदर अर्जामध्ये खोटा मजकुर सादर करून न्यायालयाची दिशाभुल करण्याचा व दाव्याचे कामकाज लांबविण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**३.** वादी व प्रतीवादींच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, म्हणणे व पटलावरील कागदपत्रे यांचे अवलोकन केल.

**४.** वादीने सदरचा दावा हा प्रतिवादीने केलेली मोजणी १३५२/२०२२ ही बेकायदेशीर आहे हे ठरवून मिळण्यासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे.

वादींची दावा मिळकत ही गट क्र.३६३/१, ३६३/२ व ३८८/३ ही आहे व प्रतिवादींची दावा मिळकत ही ३७९/४ ही आहे. प्रतिवादींनी पुर्वी मो.र.नं. १२४७/२०२२ मोजणी केली होती. सदर मोजणीमध्ये कोणतेही अतिक्रमण दाखविण्यात आले नाही. परंतु, प्रतिवादीने केलेल्या मो.र.नं.१३५२/२०२२ मध्ये गट क्र.३६३ व ३८८ यांनी अतिक्रमण केल्याचे दर्शविलेले आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद हा अतिक्रमणाचा आहे. प्रतिवादींनी सदर अर्जामध्ये केवळ गट क्र.३७९ व त्याच्या पोटहिश्यांची मोजणी करून मागितलेली आहे. परंतु, वादी व प्रतिवादी यांच्या गटांची एकत्रित मोजणी जोपर्यंत होत नाही तोपर्यंत अतिक्रमण कोणी केले हे निश्चित केले जाउ शकत नाही. अतिक्रमण निश्चित करण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताद्वारे वादी व प्रतिवादी यांच्या दावा मिळकतींची मोजणी होणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज हा अंशत: मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

**—:: <u>आदेश</u> ::—**

**१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** तालुका उपअधिक्षक, भुमी अभिलेख, देवळा यांची गट क्र. ३६३, ३८८, ३७९ मौजे देवळा, ता. देवळा, जि. नाशीक यांची मोजणी करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करण्यात येत आहे.

**३.** न्यायालयीन आयुक्त यांना असे निर्देशीत करण्यात येत आहे की, त्यांनी वरील गटांची व पोटहिश्यांची मोजणी करून वादी व प्रतिवादी यांचे महसुल अभिलेखाप्रमाणे असलेले क्षेत्र व त्यांच्या ताब्यात असलेले क्षेत्र नमूद करून अतिक्रमणअसल्यास सदर क्षेत्र हे नकाशामध्ये दर्शवावे व अहवाल सादर करावा.

**४.** प्रतिवादींना असे निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी सदर आदेशापासुन एक महिन्याच्या आत सदर न्यायालयीन आयुक्ताचा भत्ता भुमीअभिलेख, देवळा यांच्या कार्यालयात जमा करावा.

**५.** प्रतिवादी व वादींना निर्देश देण्यात येते की, त्यांनी सदर दवामिळकतीच्या मोजणीच्या वेळी हजर रहावे.

६. न्यायालयीन आयुक्ताला असे निर्देश देण्यात येते की त्यांनी नियमाप्रमाणे लगत धारकांना, पोटहिश्येधारकांना, वादी व प्रतीवादींना नोटीस काढावी. तसेच प्रतिवादीने लगत कब्जे धारकांची, मालकांची यादी न्यायालयीन आयुक्तांना दयावी.

७. प्रतिवादीने सदर मोजणीचा भत्ता संबंधीत कार्यालयात जमा केल्यानंतर, न्यायालयीन आयुक्त यांना निर्देश देण्यात येते की, त्यांनी दावामिळकतीची मोजणी करून त्याबाबतचा अहवाल सदर आदेशापासुन ९० दिवसांच्या आंत न्यायालयात सादर करावा.

स्वाक्षरी/—
( डि.एम.गित्ते )
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कळवण.

ठिकाण :— कळवण.
दिनांक :— २७/०८/२०२४